www.sahyandrinews.com

दैनिक

# सह्याद्रीचा राखणदार

• संस्थापक संपादक : मारोती नारायण घुमे •

• (महाराष्ट्र) • वर्ष ०१ ले • अंक ९५ • Title - Code :- MAHMAR49513 • शनिवार दि.३० डिसेंबर २०२३ • पाने ४ • पान १ • मो. ९०११७ ०८८४० • किंमत २ रु.

Scan QR code to visit... Epaper Portal

Scan QR code to visit... Epaper Portal

## शिंदे गट भाजपमध्ये १००% विलीन होणार

# लवकरच भाजपची चाल अजित पवार- शिंदेंना कळेल-वडेट्टीवार



**मुंबई**–शिवसेना शिंदे गट हा भाजपमध्ये विलीन होणार, हे १०० टक्के खरे आहे आणि असेच होणार असा दावा राज्याचे विरोधी पक्षनेते विजय वडेट्टीवार यांनी केले आहे. तसेच भाजपची चाल एकनाथ शिंदे आणि अजित पवारांना कळेल, असा दावाही त्यांनी केला आहे.

वडेट्टीवार म्हणाले, ''शिंदे गटाकडे भाजपमध्ये सामील होण्याशिवाय दुसरा पर्यायच नाही. कारण ते स्वबळावर निवडणूक लढू शकणार नाहीत. याशिवाय भाजपही त्यांना स्वबळावर लढू देणार नाही. भाजपला २८८ जागा या कमळावरच लढायच्या आहेत. हे सर्व जण मोहरे असून भाजपची चाल अजित पवार आणि एकनाथ शिंदे यांना कळेल. भाजपचा २८८ जागा लढवण्याचा प्लॅन नक्की आहे'', असे वडेट्टीवार म्हणाले.यावेळी बोलताना विजय वडेट्टीवार यांनी देवेंद्र फडणवीस यांनी नागपूरमधील काँग्रेसच्या रॅलीवरुन केलेल्या टीकेला प्रत्युत्तर दिले आहे. ''देवेंद्र फडणवीसांचा चष्मा हा जवळचा आहे लांबचा नाही. त्यामुळे रॅली लांब होती जी त्यांना दिसली नसेल. त्यांचा चष्मा रिडिंगचा आहे ज्याचा जसा चष्मा तसे त्यांना दिसते'', असा टोला वडेट्टीवार यांनी लगावला आहे.आज दिल्लीत जागा वाटपसदर्भात पहिली बैठक होत आहे. ''कोणी कोणत्या जागा लढवाव्यात यावर चर्चा होणार असल्याची माहिती विजय वडेट्टीवार यांनी दिली. तसेच काँग्रेस २२ जागा लढवणार असल्याच्या चर्चांवर ही त्यांनी स्पष्टिकरण दिले. ''काँग्रेसने किती जागा लढाव्यात यावर मी बोलणार नाही. इंडिया आघाडीच्या बैठकीत जे ठरेल ते आम्हाला मान्य आहे'', असे विजय वडेट्टीवार म्हणाले.दरम्यान, शिवसेना आमदार अपात्रतेचा निकालाची तारीख जवळ येत आहे. या निकालाआधीच शिवसेना शिंदे गट भाजपमध्ये विलीन होणार असल्याच्या चर्चा राजकीय वर्तुळात रंगू लागल्या आहेत. विधानसभा अध्यक्ष राहुल नार्वेकर यांनी शिंदे गटातील १६ आमदारांना अपात्र ठरवल्यास भाजपने हा प्लान बी तयार ठेवल्याचे म्हंटले जात आहे. अशातच विरोधी पक्षनेते विजय वडेट्टीवार यांनी मोठे विधान केले आहे.



# अशी पाखरे येती ६ पारितोषिकांसह कामगार राज्य नाट्य स्पर्धेच्या अंतिम फेरीत दाखल

### हेमंत गुहे,पंकज मलिक,तुषार चहारे,अंकुश राजूरकर,समृध्दी कांबळे पारितोषिकांचे मानकरी

**चंद्रपूर । प्रतिनिधी**

६९ व्या कामगार राज्य नाट्य स्पर्धेच्या नागपूर विभागीय प्राथमिक फेरीत कामगार कल्याण केंद्र मुल रोड चंद्रपूर यांनी सादर केलेल्या विजय तेंडुलकर लिखित पंकज मलिक दिग्दर्शित अशी पाखरे येती या नाटकाने सांघिक तृतीय पारितोषिकासह ६ पारितोषिके प्राप्त करत कामगार राज्य नाट्य स्पर्धेची अंतिम फेरी गाठली आहे.या नाटकाने नुकत्याच झालेल्या राज्य नाट्य स्पर्धेच्या प्राथमिक फेरीत देखील सांघिक तृतीय पारितोषिक पटकावले आहे. कामगार राज्य नाट्य स्पर्धेच्या प्राथमिक फेरीत सांघिक तृतीय पारितोषिकासह पंकज मलिक यांना सर्वोत्कृष्ट दिग्दर्शन तृतीय , हेमंत गुहे यांना सर्वोत्कृष्ट प्रकाशयोजना तृतीय , अंकुश राजूरकर यांना सर्वोत्कृष्ट नेपथ्य तृतीय तर उत्कृष्ट पुरुष अभिनयाचा गुणवत्ता पुरस्कार तुषार चहारे आणि उत्कृष्ट स्त्री अभिनयाचा गुणवत्ता पुरस्कार समृद्धी कांबळे यांना जाहीर झाला आहे.या नाटकात तुषार चहारे , विशाखा देशपांडे , समृद्धी कांबळे , बबन राखुंडे, सूरज उमाटे , अक्षय मेश्राम, बाल कलाकार निश्चय मुळावार ,अमृता मुळावार यांनी भूमिका अभिनित केल्या आहेत. नाटकाचे निर्माते रविंद्र वांढरे असून तेजराज चिकटवार , पंकज नवघरे, श्रीनिवास मुळावार यांनी देखील निर्मिती प्रक्रियेत मोलाचे योगदान दिले आहे.या नाटकातील सर्व कलावंत नाट्य प्रशिक्षण शिबिरातील प्रशिक्षणार्थी असून या आधी भर चौकात गांधी पुतळ्यासमोर , वृंदावन या नाटकात या कलावंतांनी उल्लेखनीय यश प्राप्त केले आहे.अशी पाखरे येती नाटकाच्या विजयी चमूने २७ डिसेंबर रोजी नागपुरात सिने अभिनेते देवेंद्र दोडके , नरेंद्र शिंदे , सहा . कल्याण आयुक्त नंदलाल राठोड यांच्या हस्ते सांघिक व वैयक्तिक पारितोषिके स्वीकारली.यावेळी स्पर्धेचे परीक्षक विकास फटींगे , लक्ष्मण जाधव आणि प्रियंका ठाकूर यांचीही उपस्थिती होती.




# प्रा.धनराज आस्वले आता स्व.श्रीनिवास शिंदे मेमोरिअल रविंद्र शिंदे चॅरिटेबल ट्रस्टचे आजीवन अध्यक्ष तर सामाजिक कार्यकर्त्या रुपाली शिंदे सेक्रेटरी पदावर


**भद्रावती । प्रतिनिधी**

स्व. श्रीनिवास शिंदे मेमोरिअल रविंद्र शिंदे चॅरिटेबल ट्रस्ट ही संस्था कोविड-१९ प्रादुर्भाव काळापासून आरोग्य, सामाजिक, क्रीडा, प्रबोधन, शैक्षणिक दत्तक, अभ्यासिका, व्यसनमुक्ती, महिला सक्षमीकरण, युवा योजना आदी क्षेत्रात उत्तम कार्य करून परिसरात नावारूपास आली आहे. सामाजिक कार्यकर्ते रविंद्र शिंदे हे या संस्थेचे संस्थापक अध्यक्ष होते. तर प्रा. धनराज आस्वले हे कार्यकारी अध्यक्ष होते. यांच्या मार्गदर्शनात ट्रस्ट जिल्ह्यात व प्रामुख्याने वरोरा तथा भद्रावती तालुक्यात विविध क्षेत्रात जनहितार्थ कार्य करत आहे. सामाजिक कार्यासोबत राजकीय क्षेत्रात सक्रिय झाल्याने रविंद्र शिंदे यांनी ट्रस्टच्या अध्यक्ष पदाचा राजीनामा दिला. आता ते ट्रस्टचे विश्वस्त म्हणून काम पाहत राहील व ट्रस्ट चे कार्यकारी अध्यक्ष धनराज आस्वले यांना धर्मदाय आयुक्त चंद्रपुर कार्यालयातून सर्व कायदेशीर परवानगी घेवुन अध्यक्ष बनविण्यात आले आहे तसेच सामाजिक कार्यकर्त्या रुपाली शिंदे यांच्या कडे ट्रस्टच्या सेक्रेटरी पदाची जवाबदारी देण्यात आली आहे.सामाजिक कार्यकर्ते प्रा. धनराज कान्होबाजी आस्वले हे उच्चविद्या विभूषित आहेत. प्रा. धनराज कान्होबाजी आस्वले यांचा भद्रावती तालुक्यातील देऊरवाडा या गावातून प्रवास सुरू झाला. त्यांनी वाणिज्य शाखेत पदव्युत्तर शिक्षण प्राप्त केलेले असून त्यांचे बी.एड., एम.फिल. झाले आहे. सध्या ते समाजशास्त्र विषयात एम.ए. करीत आहे. सहकार व शिक्षण क्षेत्रात त्यांच्या आयुष्याची कारकीर्द गेली. परदेशात बहरीन येथे छत्तीस वर्षे त्यांनी प्राध्यापक म्हणून नोकरी केली. जगभरात एकोणचाळीस देशांना त्यांनी भेटी दिल्या. राष्ट्रहीत व समाजहित जोपासत त्यांचे सामाजिक कार्य सुरू आहे. ट्रस्टच्या सेवेचा लाभ घ्यावा व सामाजिक क्षेत्रात आवड असलेल्यांनी ट्रस्ट सोबत जुडावे असे ट्रस्टचे नवे अध्यक्ष प्रा. धनराज आस्वले म्हणाले.





# डोणी गावांचे सर्व महसूली दस्ताऐवजासह सर्व योजनांचा लाभ मूल तालुक्यातून द्यावा -ॲड.गोस्वामी



**मूल । प्रतिनिधी**

चंद्रपूर जिल्हा प्रशासनाने शासनाच्या अधिसुचनेची ४ वर्षापासून अमंलबजावणी न केल्यांने मागील ४० वर्षापासूनची डोणी वासीयांना अडचणीचा सामना आजही करावा लागत आहे.जिल्हाधिकारी यांनी तातडीने याबाबत निर्णय घेवून डोणी गावांचे सर्व महसूली दस्ताऐवजासह सर्व योजनांचा लाभ मूल तालुक्यातून द्यावा अशी मागणी श्रमिक एल्गारच्या ड पारोमीता गोस्वामी यांनी केली.

ताडोबाच्या कोअरझोनला लागूनच डोणी हे गांव असून हे गांव १०० टक्के आदिवासी गाव आहे. हे गाव चंद्रपूर तालुक्यात समाविष्ट आहे.या गावचे सर्व व्यवहार हे मूल येथून चालतात,मात्र तालुका चंद्रपूर असल्यांने सर्व महसूली कामे, योजनांच्या लाभासाठी चंद्रपूर गाठावे लागते. डोणी हे किर्र जंगलात असून वाहतूकीची व्यवस्थाही योग्यरित्या नाही.त्यामुळे लहान-लहान कामासाठी चंद्रपूरला जाणे सोईचे नसल्याने डोणी वासीयांची मोठी अडचण होत होती. डोणी गाव चंद्रपूर तालुक्यातून वगळून मूल तालुक्यात जोडावे यासाठी गावकरी मागील ४० वर्षापासून प्रशासनाकडे सतत मागणी करीत होते.मात्र प्रशासनाने दखल न घेतल्यांने श्रमिक एल्गारने डोणी वासीयांची मागणी प्रशासनाकडे लावून धरली. जिल्हाधिकारी, विभागीय आयुक्त, महसूल विभागाचे प्रधान सचिव यांची प्रत्यक्ष भेट घेवून डोणी वासीयांची मागणी लावून धरल्याने मंत्रालयाने ४ जून २०१८ रोजी प्रारूप अधिसुचना प्रकाशीत केली व आक्षेप मागवीले. आक्षेप नसल्यास १ जुलै २०१८ पासून चंद्रपूर तालुक्यातून वगळण्यात येईल व मूल तालुक्यात जोडण्यात येईल असे अधिसुचनेत स्पष्ट केले .या अधिसुचनेवर कोणाचेही आक्षेप आले नाही मात्र अधिसुचनेप्रमाणे डोणी गाव मूल तालुक्यात जोडण्यात आले नाही. श्रमिक एल्गारने पाठपुरावा कायम ठेवल्यानंतर दिनांक ९ फेब्रुवारी २०१९ रोजी शासनाचे उपसचिव रविराज कल्ले यांनी अंतिम अधिसुचना काढून १ मार्च २०१९ पासुन डोणी हे गाव चंद्रपूर तालुक्यातून वगळण्यात येईल आणि चंद्रपूर जिल्हयांच्या मूल तालुक्यात समाविष्ट करण्यात येईल असे निविर्दिष्ट केले. शासनाने अंतिम अधिसुचना काढूनही डोणी गावचे संपूर्ण दस्ताऐवज मूल तालुक्यात हस्तांतरीत केले नाही . तहसिल कार्यालयाशी संबधीत योजना अजूनही चंद्रपूर तालुक्यातूनच करावे लागत असल्यांने डोणी वासीयांची समस्या जैसे थेच आहे.जिल्हाधिकारी यांनी दिनांक ९ फेब्रुवारी २०१९ च्या अधिसुचनेची अमंलबजावणी करावी अशी मागणी २९ डिसेंबर ला डोणी येथील नागरीकांसह श्रमिक एल्गारच्या संस्थापिका ड. पारोमिता गोस्वामी, विजय सिध्दावार यांनी मागणी केली.

# घुग्घुस-वणी मार्गावरील एसटी बस सुरू करण्याकरीता अधिकाऱ्यांसमवेत विवेक बोढे यांनी केले परीक्षण

**चंद्रपूर । प्रतिनिधी**

घुग्घुस-वणी मार्गावरील राज्य परिवहन महामंडळाची सुपर व साधारण बस (सार्वजनिक बस) गेल्या एक वर्षा पासून बंद आहे.त्यामुळे शालेय विद्यार्थी, जेष्ठ नागरीक, आजारी रुग्ण, छोटे व्यावसायिक, भाजीपाला उत्पादक, दैनंदिन प्रवासी यांना समस्येचा सामना करावा लागतो.

यामुळे सर्व सामान्य जनतेला खाजगी सेवा पुरविणाऱ्या वाहनांनी प्रवास करावा लागतो व जास्त प्रवास भाडे मोजावे लागते, विद्यार्थांना टेम्पो क्लब पासून शाळेत पायी चालत जावे लागते. अशा अनेक समस्या घुग्घुस-वणी मार्गावरील नागरिकांना सहन कराव्या लागतात.तेव्हा नागरिकांच्या समस्या लक्षात घेऊन ना. सुधीर मुनगंटीवार मंत्री वने व सांस्कृतिक कार्य व मत्स्य व्यवसाय, पालकमंत्री चंद्रपूर गोंदिया तसेच देवराव भोंगळे राजुरा विधानसभा प्रमुख तथा माजी अध्यक्ष जि.प. चंद्रपूर यांच्या अथक प्रयत्नांनी व विजय पिदुरकर माजी सदस्य जि. प. यवतमाळ यांनी केलेल्या अथक पाठपुराव्याने तसेच विवेक बोढे प्रदेश उपाध्यक्ष, भाजयुमो महाराष्ट्र यांच्या परिश्रमाला यश प्राप्त झाले. गुरुवार, २८ डिसेंबर रोजी महाराष्ट्र राज्य परिवहन महामंडळचे अधिकारी किशोर कुळसंगे यांच्या उपस्थितीत उडानपुल बांधकाम चालू असलेल्या ठिकाणी महाराष्ट्र राज्य परिवहन महामंडळ बस चालवून परीक्षण करण्यात आले.परीक्षण पूर्ण झाल्यानंतर लवकरच नियमित बससेवा सुरू होईल.



## मुल वनपरिक्षेत्रात तब्बल आठ वाघाचे अधिवास

# मूल बफरचे वनपरिक्षेत्राधिकारी राहुल कारेकर यांची प्रेस क्लब मुलच्या मीट द प्रेस कार्यक्रमात माहिती

**मूल । प्रतिनिधी**

मूल बफर झोनमध्ये वनपरिक्षेत्रांतर्गत आठ वाघाचे अस्तित्व आहे त्यात चार नर वाघ आणि चार मादी वाघ. ही माहिती दिली मूल बफरचे वनपरिक्षेत्राधिकारी राहुल कारेकर यांनी.प्रेस क्लब मूल वतीने घेण्यात आलेल्या मीट प्रेस या कार्यक्रमात त्यांनी ही माहिती दिली.स्थानिक वन विश्रामगृहात हा कार्यक्रम घेण्यात आला.

वरोरा तालुक्यात जन्मलेल्या आणि वाढलेल्या राहुल कारेकर हे सहज म्हणून वन विभागाचे भरतीसाठी अर्ज केले आणि त्यांना नियुक्ती मिळाली. सधन आणि सुखवस्तू घरात जन्म झाल्याने नोकरी करावीच अशी काही सुरुवातीपासून इच्छा नव्हती, मात्र आपण मेकॅनिकल इंजिनियर झालो पाहिजे यासाठी त्यांनी प्रयत्न केले. पॉलिटेक्निक झाल्यानंतर त्यांना मेकॅनिकल ही शाखा न मिळता सिविल मिळाल्याने, त्यांनी इंजिनिअर होण्याचा विषय सोडून दिला, अशी माहिती त्यांनी एका प्रश्नाचे उत्तर देताना दिली .चंद्रपुरातील धुमाकूळ घालणाऱ्या एका मादी बिबट्याला शूट करण्याचे आदेश आपल्याकडे असताना आपण त्यांना बेशुद्ध केले आणि पंधरा दिवसातच त्या बिबट्याला दोन पिले झाली,तीन जीव वाचविल्याने आपल्याला आनंद मिळाला आणि तो दिवस माझ्या वाढदिवसाचा होता हा आपल्या आयुष्यातील आनंदाचा दिवस असल्याचे त्यांनी वार्तालाप करताना सांगितले.कर्तव्य बजावताना आपल्या कर्मचाऱ्यांना झालेली मारहाण हा माझ्यासाठी दुःखद क्षण असल्याचेही त्यांनी सांगितले.आपली पहिली नेमणूक गडचिरोली जिल्ह्यातील सिरोंचा भागात झाली, नक्षलवाद्याचे आव्हान होते मात्र आपल्याला वन तस्करी रोखताना कुठलाही त्रास झाला नसल्याची कबुली त्यांनी दिली.आपण वन विभागात नोकरीवर नसतो तर शेती किंवा राजकारणात राहिलो असतो असेही त्यांनी सांगितले.वन्य प्राण्यांच्या वाढत्या संख्येमुळे वन्यजीव व मानव यांच्यातील संघर्ष वाढत आहे, शक्य तिथे जंगलाला कुंपण करणे हा एक चांगला उपाय असल्याचेही त्यांनी मानव वन्यजीव संघर्षावर विचारलेल्या प्रश्नाचे उत्तरात सांगितले.वन्य प्राण्यांचा शेतकऱ्यांना त्रास होतो हेही त्यांनी कबूल केले.



संपादकीय

# अधिकारांचा बोजवारा




भारतीय नागरिकांना माहितीचा अधिकार सहजासहजी मिळालेला नाही. त्यासाठी ज्येष्ठ समाजसेवक अण्णा हजारे यांनी मोठे आंदोलन उभारले होते. ही दोन दशकांपूर्वीची घडामोड आता समाजमनाच्या विस्मरणात गेली असली, तरी या आंदोलनातून नागरिकांना मिळालेल्या अधिकारांचा योग्य तो लाभ झालेला दिसत नाही. केंद्रीय माहिती कायद्याच्या आधीच महाराष्ट्रात हा कायदा झाला होता. त्याहीमागे अण्णा हजारे यांचाच आग्रह होता. केंद्रातील कायदा हा बराचसा महाराष्ट्रातील माहितीच्या कायद्यावर आधारित बेतलेला आहे.महाराष्ट्र हा माहितीच्या अधिकारांबाबत देशात अग्रणी आणि अग्रभागी आहे, हे यातून लक्षात यावे. या पार्श्वभूमीवर महाराष्ट्रात या कायद्याच्या अंमलबजावणीबाबत चाललेली चालढकल खेदकारक आहे. हा कायदा अमलात यायचा असेल आणि नागरिकांच्या हातातील अधिकार प्रत्यक्षात यायचे असतील तर त्यासाठी सक्षम यंत्रणा उभी करणे, ही राज्य सरकारची जबाबदारी आहे. मात्र, ही जबाबदारी सरकार आणि राज्याचे प्रशासन पार पाडताना दिसत नाही. तसे नसते तर महाराष्ट्रात माहितीच्या अधिकारात नागरिकांनी केलेल्या अर्जांच्या थप्प्या लागल्या नसत्या. जसा वेळेत न मिळणारा न्याय, हा अन्यायच असतो; त्याप्रमाणे, नागरिकांनी मागितलेली माहिती जर त्यांना वेळेत मिळाली नाही, तर त्या माहितीची सगळी उपयुक्तताच संपून जाऊ शकते. पुष्कळदा नागरिक न्याय मिळण्यासाठी या अधिकारांचा वापर करतात. मुळात सत्य माहिती हेच शस्त्र असते. हे शस्त्र नागरिकांच्या हातात असेल, तर त्यांना न्याय मिळण्याची शक्यता थोडी तरी वाढते. मात्र, माहिती मागणाऱ्या नागरिकांना जर ती दिलीच जात नसेल तर संभाव्य न्यायाचे दरवाजेही बंद करून टाकण्यासारखेच आहे.काही काळापूर्वीच मुंबई उच्च न्यायालयाने राज्यातील माहिती आयुक्तांची सारी पदे भरलेली नसल्याबद्दल नाराजी व्यक्त केली होती. राज्यात मुंबईसहित सात खंडपीठे आहेत. याशिवाय, मुंबईत राज्य माहिती आयुक्तांचे मुख्यालय आहे. या एकूण आठ ठिकाणी जी पदे रिकामी आहेत, ती लवकरच भरण्यात येतील, असे आश्वासन राज्य सरकारने न्यायालयात दिले आहे. ते आता कधी प्रत्यक्षात येते, हे पाहायला हवे. माहिती अधिकाराच्या कायद्यानुसार पहिल्या अपिलातला निकाल जर पटला नाही, तर त्याला आव्हान देऊन दुसरे अपील करण्याचीही मुभा आहे. मात्र, पहिल्याच अर्जाचा निकाल लागत नसेल आणि माहिती मिळत नसेल तर अपिलात जाण्याचा प्रश्नच नाही. राज्यात आज मुंबई, अमरावती, औरंगाबाद, नागपूर, पुणे, कोकण, नाशिक अशी सात माहिती आयुक्तांची पदे आहेत. याशिवाय, मुंबईत राज्याचे मुख्य माहिती आयुक्त असायला हवेत. या एकूण आठ पदांवर मिळून सध्या फक्त चार माहिती आयुक्त आहेत. मुख्य माहिती आयुक्त म्हणून अतिरिक्त कार्यभार सांभाळणाऱ्या आयुक्तांकडे इतरही तीन ठिकाणचा कार्यभार आहे. हे मुख्य माहिती आयुक्त मुळात पुण्यातील माहिती आयुक्त आहेत. याशिवाय, इतरही माहिती आयुक्तांकडे अतिरिक्त कार्यभार आहे. माहिती आयुक्तांनी ठरविले तर त्यांच्याच मूळ कार्यक्षेत्रातील तक्रारींचा निपटारा काढण्यासाठी बराच काळ लागू शकतो. मग हे आयुक्त अतिरिक्त कार्यभार असलेल्या शहरांमध्ये जाणार कधी आणि तिथल्या तक्रारींचा निपटारा करणार तरी कधी? 'महाराष्ट्र टाइम्स'ने प्रकाशित केलेल्या विशेष वृत्तान्तात कोणत्या आयुक्तांकडे किती तक्रारी निकालांची वाट पाहात आहेत, याची आकडेवारी देण्यात आली आहे.राज्यभरात मिळून सर्व स्तरांवर सर्वसामान्य नागरिकांच्या हजारो तक्रारी जर प्रलंबित राहणार असतील तर आपण उभ्या केलेल्या या यंत्रणेचा नेमका फायदा तरी काय, याचे आत्मपरीक्षण राज्य सरकारने करायला हवे. मध्यंतरी माहितीच्या अधिकारांचा वापर करून काही मंडळी आपला स्वार्थ साधत असल्याच्या तक्रारी आल्या होत्या. तसे होतही असेल. भारतात प्रत्येक नियम, कायदे, विशेष तरतुदी आणि सवलती यांचा वापर होण्याआधीच गैरवापर सुरू होतो. तसे याबाबतही होत असेल. मात्र, या सगळ्यात जे न्याय मिळण्यासाठी माहिती आयुक्तांकडे धाव घेतात, त्यांना किती काळ वाट पाहायला लावणार? राज्यभरात माहिती आयुक्तांकडे ऑक्टोबर महिन्याच्या अखेरीस ९० हजारांपेक्षा अधिक अपिले प्रलंबित होती. पुढच्या महिन्यात थोडे वेगाने काम झाले. तरीही, आजही हजारो अपिलांवर निकाल बाकी आहेच. मुळात आयुक्तांच्या कार्यालयात हे काम वेगाने झाले, तरच प्रत्येक कार्यालयात नेमले गेलेले हजारो माहिती अधिकारी नीट काम करतील. भारतीय नागरिकांच्या हातात हे हत्यार येऊन आता दोन दशके उलटली. इतका वेळ होऊनही त्या हत्याराचा नेमका वापर होऊ शकत नसेल तर नागरिकांचे या कायद्यामुळे सबळीकरण झाले, असे कसे म्हणता येईल? साऱ्या जगावर नजर टाकली तर भारताइतके हक्क आणि अधिकार असणारे नागरिक मोजक्याच लोकशाही देशांमध्ये असतील. मात्र, कागदावरचे हक्क आणि प्रत्यक्षातली अंमलबजावणी याबाबतही भारताइतके अंतर क्वचितच दुसऱ्या कोणत्या देशात असेल. भारतीयांचा हा खास दंभयोग इथेही चालू असावा, यात काही नवल नाही.

# जगातील पहिला 'एआय' नियमन कायदा

युरोपीय महासंघाने ९ डिसेंबर रोजी तब्बल ३७ तासांच्या वाटाघाटीनंतर जगातील पहिला कृत्रिम बुद्धिमत्तेचा (एआय) वापर आणि नियमनाबाबत कायदा येत असल्याची माहिती दिली. कृत्रिम प्रज्ञेवर आधारित अनेक साधने व त्यांच्या सर्रास होणारा वापर याबाबतचा हा कायदा ऐतिहासिक मानला जातो. युरोपीय महासंघाचे कमिशनर थियरी ब्रेटन आणि महासंघाच्या अध्यक्षा उर्सुला वॉन डर लेयन यांनी याबाबत 'एक्स' (ट्विटर) पोस्टद्वारे माहिती दिली.सध्या या कायद्याबाबत युरोपीय महासंघामधील सर्व देशांमध्ये हा करार झाला आहे. २०२४च्या सुरुवातीला युरोपीय संसदेत या प्रस्तावावर मतदान होणार आहे. साधारण २०२५ पर्यंत हा कायदा लागू होण्याची शक्यता वर्तवली जाते. जगभरात 'एआय'च्या सुरक्षित वापराबद्दल चर्चा चालू असताना युरोपीय महासंघाने असा कायदा प्रस्तावित करून समस्त जगासमोर आदर्श निर्माण केला आहे.अमेरिका, चीन, ऑस्ट्रेलिया इ. अशा अनेक देशांमध्ये 'एआय'च्या वापराबद्दल कायदा आणण्याच्या चर्चा चालू आहेत. युरोपीय महासंघाच्या या निर्णयामुळे जगभरातील इतर देशांना प्रेरणा मिळेल, हे नक्कीच! 'एआय'चे संभाव्य धोके लक्षात घेता या पावलाचे स्वागत होताना दिसत आहे. यामुळे 'एआय'च्या गतीवर परिणाम होईल, हे देखील बोलले जाते.




या कायद्याच्या मसुद्यातील ठळक मुद्दे

युरोपीय महासंघाच्या नव्या 'एआय' कायद्यानुसार 'एआय'च्या वापरावर अनेक प्रकारे निर्बंध येणार आहेत. लोकांच्या सुरक्षिततेला, अधिकाराला ठेच न पोचवता 'एआय'चा वापर तंत्रज्ञानाचा विकास करण्यासाठी व्हावा, हे या कायद्यामागचे प्रमुख कारण आहे, असे युरोपीय महासंघातर्फे स्पष्ट करण्यात आले आहे.

– फेशियल रेकग्निशनचा वापर असलेल्या बऱ्याच 'एआय' प्सवर आता निर्बंध घालण्यात येणार आहेत. मानवी वर्तनावर ताबा मिळवण्यासाठी 'एआय'चा वापर आटोक्यात राहावा, यासाठी नियम करण्यात येतील.

– जनरेटिव्ह 'एआय'च्या वापरावर निर्बंध नसणार आहेत. पण ही अशी प्लिकेशन बनवणाऱ्या कंपन्यांना वैधानिक इशारा देणं गरजेचं असणार आहे. त्याचबरोबर या अशा 'एआय' साधनांनी डेटा (विदा) कुठून संग्रहित केला किंवा कुठला डेटा वापरून ते प्लिकेशनचे प्रशिक्षण झाले, हे प्रामुख्याने सांगणे बंधनकारक असणार आहे.

– काही 'एआय' प्लिकेशनवर सरळसोट बंदी घालण्यात येणार असून, काही प्सवरील डेटा साठवणीकडेही काटेकोरपणे लक्ष देण्यात येणार आहे.

उल्लंघन करणाऱ्यांना दंड

उच्चतम जोखमीच्या क्षेत्रांमध्ये 'एआय'चा वापर प्रतिबंधित प्रमाणात होईल. पण स्वयंचलित वाहनांमधील तसेच ऑटोमोबाईल क्षेत्रातील 'एआय'च्या वापराबद्दल काहीच वाच्यता न झाल्याने अनेकांच्या भुवया उंचावल्या आहेत. सुरक्षिततेच्या कारणास्तव दहशतवादी हल्ला, दंगल, धार्मिक अथवा सामाजिक ताणतणावाच्या प्रसंगी संशयीत गुन्हेगारांवर नजर ठेवण्यासाठी किंवा हरवलेल्या व्यक्तींचा शोध घेण्याकरिता 'एआय'प्रणित 'रियल टाईम बायोमेट्रिक सर्व्हिलन्स'चा वापर करण्यात येणार आहे. सीसीटीव्ही कॅमेरा, इमेज रेकग्निशन, डीपलार्निंगमार्फत हे काम केले जाणार आहे.नियमांचे उल्लंघन करणाऱ्या कंपन्यांना कठोर दंड आकारले जाणार आहेत. वार्षिक उलाढालीच्या २% ते ७% रक्कम दंड म्हणून आकारण्यात येणार आहे. तंत्रज्ञान क्षेत्रात ठोस पावले उचलण्यात युरोपीय महासंघ नेहमीच अग्रस्थानी असतो. लोकांच्या गोपनीय माहितीची तडजोड न होऊ देता विकसनशील तंत्रज्ञानाची सांगड घालणे याकडे युरोपीय महासंघाचे लक्ष असणार आहे. नागरिकांची गोपनियता प्रामुख्याने जपण्यासाठी खंबीर पावले उचलली जात आहेत.नुकतीच ब्रिटनमध्ये 'एआय' सुरक्षितता या विषयावर जागतिक परिषद भरवण्यात आली होती. भारतासह अनेक देशांनी या परिषदेत उपस्थिती नोंदवली. वाढत्या प्रमाणात होणाऱ्या 'एआय'च्या वापरामुळे निर्माण होणाऱ्या धोक्यांचा विचार करण्यात आला आणि चिंता देखील व्यक्त केली. पण दुर्दैवाने या चर्चेत फलित असे काही मिळाले नाही.मागच्या आठवड्यात नवी दिल्ली येथे 'ग्लोबल पार्टनरशिप ऑन आर्टिफिशियल इंटेलिजन्स'ची शिखर परिषद पार पडली. त्यात 'एआय' निगडित अनेक विषयांवर सखोल चर्चा झाली, पण युरोपिय महासंघासारखा कायदा किंवा त्याबाबतची तरतूद असे परिषदेच्या दरम्यान फार काही झाले नाही. कायदे हवेत याबाबत सर्वांचं एकमत होते, पण नक्की काय; असे ठोस काही चर्चेअंती गवसले नाही.

'एआय फोर ऑल' उपक्रम

आजमितीला 'एआय'च्या बुद्धीवर, वेगावर अंकुश ठेवण्याची गरज आहे. त्याकरता कायद्यांशिवाय गत्यंतर नाही, याची जाणीव देखील आहे. विविध देश, त्यांची सरकारे या विषयाचा सखोल अभ्यास करीत आहेत. पण 'एआय'च्या वापराबाबत कायद्याची चौकट निर्माण करण्यासाठी मसुदा बनवणारे युरोपीय महासंघ एकमेवच.भारताची 'एआय' नियमनाबद्दलची भूमिका ही सुरुवातीपासून सावधगिरीची आहे. तंत्रज्ञानाचा वापर सर्वदूर व्हावा या विचाराने 'एआय फोर ऑल'सारख्या उपक्रमांची नांदी आपल्या इथे झाली. शिक्षण, उद्योग, आरोग्य, समाजव्यवस्था, वाहतूक नियंत्रण इ. अनेक विषयांमध्ये 'एआय'चा वापर आपण स्वीकारला आहेच. अनेक सरकारी डिजिटल प्लॅटफॉर्मवर देखील 'एआय'चा वाढता वापर आपल्याला दिसून येतो.पण याबरोबरच संभाव्य धोके लक्षात घेता 'डीपफेक'सारख्या तंत्रज्ञानावर ताबा ठेवण्यासाठी उपाययोजना करण्याची पावलेही आपल्या सरकारने उचलली आहेत. नव्या युगात तंत्रज्ञानाचे बोट धरून विकासाच्या रस्त्यावर सुसाट वेगाने पाऊल टाकताना ''नजर हटी दुर्घटना घटी''ची पाटी चुकवून चालणार नाही, हेच खरे.

# संघर्षाचा वणवा

इस्त्राईल–हमास यांच्यातील युद्ध थांबण्याचे नाव तर घेत नाहीच;पण त्याच्या परिणामांची जागतिक व्याप्ती वाढत चालल्याची दुश्चिन्हे दिसताहेत. 'हमास'शासित गाझा पट्टीतील वीस हजारांवर पॅलेस्टिनींचा बळी गेला आहे. यात आठ हजारांहून अधिक बालकांचा समावेश आहे. गाझा पुरते बेचिराख झाले आहे.नागरी व्यवस्था पुरती कोलमडली आहे, सरकार नावाची यंत्रणा नावापुरती असल्याने अनागोंदी आहे. पाणी, अन्नधान्यआपासून औषधांपर्यंत सगळ्यांचीच चणचण एवढी टोकाची आहे की, अराजक म्हणजे काय ते तेथे दिसते. मध्यंतरी आठवडाभर इस्त्राईल आणि हमास यांनी आपल्या ताब्यातील लोकांना सोडण्यासाठी युद्धबंदी केली. त्यानंतर पुन्हा येरे माझ्या मागल्या अशी स्थिती आहे.गाझावर इस्त्राईली बॉम्बहल्ले सतत सुरु असतानाच तिकडे येमेनमध्ये आश्रयाला असलेल्या हुथी बंडखोरांनी २३ डिसेंबर रोजी लाल समुद्रातील एमव्ही केमप्लुटो आणि त्यानंतर काही दिवसांनी एमव्ही साईबाबा या जहाजांवर जोरदार हल्ले चढवले.दोन्हींवर भारतीय खलाशी असल्याने आपल्या दृष्टीने ती चिंतेची बाब आहे. या घडामोडी दरम्यान इराकमधील सैन्याला प्रशिक्षण देणाऱ्या अमेरिकी तुकडीवर इराणचे पाठबळ असलेल्या कतैब हिजबुल्लाच्या दहशतवाद्यांनी हल्ला केला.प्रत्युत्तरादाखल अमेरिकेने त्यांच्या तीन तळांना बेचिराख केले. तिकडे इस्त्राईलने सीरियातील दमास्कसवर हल्ला करून वरिष्ठ अधिकारी ब्रिगेडियर जनरल सईद रझी मौसावी याला ठार केले. मध्य दिल्लीतील इस्त्राईली वकिलातीबाहेर मंगळवारी मध्यम स्वरुपाचा स्फोट झाला.या सगळ्या घटनांची एक सुसंगत साखळी करून त्याचा अन्वयार्थ काढण्याचा प्रयत्न केला, तर इस्त्राईल–हमास संघर्षाचे पडसाद आता जगाच्या कानाकोपऱ्यात उमटू लागले आहेत, असा निघू शकतो. भारतातील बॉम्बस्फोट आणि मौसावीची हत्त्या यांचा काही संबंध आहे का, असा प्रश्न निर्माण झाला आहे.ज्या लाल समुद्रात जहाजांना लक्ष्य केले त्या भागातून जगातील तीस टक्के कंटेनर, बारा टक्के व्यापार आणि दहा टक्के पेट्रोलजन्य पदार्थांची वाहतूक होते. हुथी बंडखोरांच्या हल्ल्यानंतर आता ही वाहतूक केप ऑफ गुडहोपकडून वळवण्यात आली आहे. परिणामी वाहतूक खर्च आणि कालावधी वाढणार आहे.सहाजिकच आयात केलेल्या मालाच्या किंमती वाढू शकतात. त्यामुळेच अमेरिकेने सुस्थिती राखण्यासाठी 'ऑपरेशन प्रॉस्पेरिटी गार्डियन' आरंभले आहे. मात्र इजिप्तने हुथींच्या हल्ल्याचा साधा निषेधही केला नाही. तर हुथींबरोबर वाटाघाटी करणाऱ्या सौदी अरेबियाने अमेरिकेच्या प्रयत्नांना मदतीचा हातही दिलेला नाही.इस्त्राईल–हमास संघर्ष सुरू झाला तेव्हा अमेरिकेचे अध्यक्ष ज्यो बायडन यांच्यासह ब्रिटन, जर्मनीसह युरोपातील अनेक देशांनी दहशतवादविरोधी लढ्याला पाठिंबा दिला होता. तथापि, इस्त्राईलने गाझामध्ये कारवाया करताना सर्वसामान्य नागरिक, रुग्णालयांना लक्ष्य केले.गाझावासीयांचे जगणे नरकयातनामय केले, युद्धातील मानवतेच्या संकेतांनाही पायदळी तुडवल्यामुळे बायडन यांच्यासह फ्रान्सचे



इमॅन्युएल मॅक्रॉन यांनी नाराजी व्यक्त केली आहे. तरीही नेतान्याहू यांचा युद्धाचा इरादा अढळ असल्याने युद्धाची व्याप्ती वाढते की काय, अशा शंकेला वाव आहे.अमेरिकेत लवकरच निवडणुकीचे वारे वाहू लागेल. देशांतर्गत फारसा प्रभाव पाडू न शकलेल्या बायडेन यांचे आंतरराष्ट्रीय राजकारणही प्रभावहीन झाले आहे. त्या पार्श्वभूमीवर नेतान्याहूंचा युद्धाचा अट्टाहास समस्या अधिक गंभीर वळणावर नेऊ शकते.दुसरीकडे हमासचा नेता याह्या सीनवारने युद्धाला तोंड फुटल्यानंतर पहिल्यांदाच तोंड उघडले. त्यानेही मागे हटणार नाही, इस्त्राईलला धडा शिकवण्याची भाषा केली आहे. आता भिस्त आहे ती इजिप्तच्या प्रस्तावावर. तीन टप्प्यांत युद्धसमाप्तीसाठी अनुकूल स्थिती निर्माण करावी, असे हा प्रस्ताव सांगतो.इस्त्राईल, हमास, अमेरिका, युरोपीय महासंघ आणि संयुक्त राष्ट्रे यांच्यासमोर तो सादर करण्यात आला आहे. त्यात मर्यादित कालावधीसाठीची शस्त्रसंधी, गरजेनुसार ती वाढवत न्यावी, असे नमूद केले आहे. उभयतांनी ओलिस, युद्धकैद्यांची अदलाबदल करावी; दुसऱ्या टप्प्यात वेस्ट बँकवर सत्ता असलेला फतेह आणि हमास यांनी मतभेद मिटवावेत,त्यानंतर सर्वंकष फेरउभारणीसाठी 'टेक्नोक्रॅटिक पॅलेस्टिनी सरकार'ची निर्मिती करावी, असे काही ठळक मुद्दे त्या प्रस्तावात आहेत. तथापि, दिवसेंदिवस आक्रमक पवित्रा घेणारे नेतान्याहू हे कितपत मानतील, याबाबत साशंकता आहे. बायडन यांच्याही विनंतीला ते फारसे जुमानताना दिसत नाहीत.अमेरिका जर लष्करी आणि आर्थिक बळावर जगाचे पुढारपण मिरवत असेल तर खरे म्हणजे युद्ध थांबविण्यासाठी त्या देशाने सक्रिय पुढाकार घ्यायला हवा. त्या देशाची या बाबतीतील उदासीनता खटकणारी आहे. पश्चिम आशियातील संघर्षात मानवतेच्या भूमिकेतून प्रश्नाच्या सोडवणूक व्हावी,असा सूर पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि सौदीचे पंतप्रधान महंमद बिन सलमान यांच्यातील संवादात व्यक्त झाला. त्या भागात शांतता, स्थैर्य आणि सुरक्षिततेला अग्रक्रम देण्यावर उभयतांचे एकमत झाले. एका अर्थाने त्याचेच विस्तारीत प्रारूप म्हणजे इजिप्तने मांडलेला प्रस्ताव म्हणता येईल.युद्धाने प्रश्न सुटत नाहीत. तालिबानला संपवण्यासाठी अमेरिका दोन दशके झुंजली, तरीही पुन्हा तालिबानच सत्तेवर आले, हा ताजा इतिहास आहे. त्यामुळेच इस्त्राईल–हमास संघर्षावर सामोपचार, वाटाघाटी हेच उत्तर आहे. त्याला तयार होण्यासाठी इस्त्राईल आणि हमास दोघांवरही जागतिक दबाव वाढवला पाहिजे.

# मतुआ महासंघाचे सामाजिक, धार्मिक आणि शैक्षणिक क्षेत्रात उल्लेखनिय योगदान - आ. किशोर जोरगेवार

## मतुआ महासंघाच्या वतीने चतुर्थ वार्षिक मतुआ महोत्सवाचे आयोजन






**चंद्रपूर । प्रतिनिधी**

मतुआ महासंघाच्या वतीने अनेक समाज उपयोगी उपक्रम राबविल्या जात आहे. धार्मिक क्षेत्रातही मोठे काम मतुआ महासंघाच्या वतीने होत आहे. समाजाकडून त्यांना मिळत असलेले लक्षणीय सहाकार्य कौतुकास्पद असून मतुआ महासंघाचे सामाजिक, धार्मिक आणि शैक्षणिक क्षेत्रात उल्लेखनिय योगदान असल्याचे प्रतिपादन आमदार किशोर जोरगेवार यांनी केले.

चंद्रपूर येथील जागृत श्री श्री हरिचांद ठाकुर मंदिर येथे मतुआ महासंघाच्या वतीने चतुर्थ वार्षिक मतुआ महोत्सवाचे आयोजन करण्यात आले होते. या प्रसंगी ते बोलत होते. या कार्यक्रमाला केंद्रीय मंत्री शंतनू ठाकूर, यांची प्रमुख अतिथी म्हणून उपस्थिती होती. तसेच या प्रसंगी शोभा मा ठाकुर, मंजुर ठाकुर, मतुआ महासंघाचे डॉ. जे. बी महालीक, सचिव शैलेन स्वराती, कोषाध्यक्ष निर्मेलेंद हलदार, छत्तीसगड चे रवी गासाई, रमेन बर, दुलाल गोसाई, डॉ. अमल पोद्दार यांच्यासह इतर मान्यवरांची उपस्थिती होती.यावेळी पुढे बोलताना आ. किशोर जोरगेवार म्हणाले कि, समाजाला वेळो वेळी योग्य दिशा देत राहण्याची गरज असते. सध्या अनेक सामाजिक सेवाभावी संस्था, संघटनच्या माध्यमातून हे ईश्वरिय कार्य केल्या जात आहे. मतुआ महासंघही समाजात धार्मिक वातावरण निर्माण करण्याचे काम करत आहे. आपण दरवर्षी सामाजिक धार्मिक कार्यक्रमाचे आयोजन करत असता यातील सातत्यता अशीच कामय ठेवण्याचे आवाहन यावेळी बोलताना आमदार किशोर जोरगेवार यांनी केले.मतुवा महासंघाअंतर्गत समाजाचा विकास, शिक्षण, सांस्कृतिक सुरक्षा आणि सामाजिक समस्या सोडवण्यासाठी अनेक कार्यक्रम घेत या पैलूंवर काम केल्या जात आहे. ही संस्था सामाजिक आणि सांस्कृतिक सौहार्द वाढविण्याचे कार्य करत आहे. समाजातील सदस्यांना एकत्र येण्यास प्रोत्साहित करत आहे. आपल्या या कार्यात लोकप्रतिनीधी म्हणून आमचे नेहमी सहकार्य असणार असल्याचे ते यावेळी म्हणाले. सदर कार्यक्रमाला समाज बांधवांची मोठ्या संख्येने उपस्थिती होती.

## कृषी महोत्सवाच्या चित्ररथास पालकमंत्री सुधीर मुनगंटीवार यांच्या हस्ते हिरवी झेंडी

**चंद्रपूर । प्रतिनिधी**

कृषी विषयक तंत्रज्ञान व शासकीय योजना शेतक-यांपर्यंत पोहचाव्यात, शेतक-यांचे सक्षमीकरण व्हावे, तसेच शेतकरी ते ग्राहक थेट विक्री साखळी विकसीत करून शेतक-यांचे उत्पन्न वाढावे, या उद्देशाने कृषी तंत्रज्ञान व्यवस्थापन यंत्रणा (आत्मा), कृषी विभाग व पशुसंवर्धन विभागाच्या वतीने दि. ३ ते ७ जानेवारी २०२४ या कालावधीत चांदा क्लब ग्राऊंड येथे कृषी महोत्सवाचे (चांदा ग्रो) भव्यदिव्य आयोजन होणार आहे. या महोत्सवाची माहिती जिल्ह्यातील सर्व शेतक-यांना होण्यासाठी आत्माच्या वतीने तयार करण्यात आलेल्या पाच चित्ररथांना पालकमंत्री सुधीर मुनगंटीवार यांच्या हस्ते हिरवी झेंडी दाखवून शुभारंभ करण्यात आला.




यावेळी नियोजन भवन येथे आढावा घेतांना पालकमंत्री ना .मुनगंटीवार म्हणाले, कृषी महोत्सवात शेतक-यांना नवीन तंत्रज्ञानाची ओळख होण्यासाठी प्रदर्शन, प्रात्यक्षिक व प्रशिक्षणाची सोय करावी. महोत्सवाचे बारकाईने नियोजन करून पाच दिवसात होणा-या विविध शेतीपयोगी उपक्रमांची माहिती, प्रात्यक्षिक तसेच प्रशिक्षणाची माहिती शेतक-यांना १ ते २ दिवसांपूर्वीच मिळेल, याबाबत नियोजन करावे, तसेच जिल्ह्यातील शेतक-यांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून या प्रदर्शनाचा लाभ घ्यावा, असे आवाहनही पालकमंत्री सुधीर मुनगंटीवार यांनी केले.यावेळी जिल्हाधिकारी विनय गौडा, मुख्य कार्यकारी अधिकारी विवेक जॉन्सन, आत्माच्या प्रकल्प संचालक प्रिती हिरुळकर, जिल्हा अधिक्षक कृषी अधिकारी शंकर तोटावार, हरीश शर्मा, राहुल पावडे, डॉ. मंगेश गुलवाडे यांच्यासह जिल्ह्यातील सर्व अधिकारी व शेतकरी उत्पादक कंपन्यांचे प्रतिनिधी आदी उपस्थित होते.

## धान खरेदी नोंदणीची मुदत वाढविली ;राज्यातील धान उत्पादक शेतकऱ्यांना मिळणार लाभ

**चंद्रपूर । प्रतिनिधी**

खरेदी केंद्रांची मोजकी संख्या आणि इंटरनेट नेटवर्कची समस्या यामुळे शेतकऱ्यांची धान खरेदी नोंदणी पुरेशी झालेली नसल्यामुळे नोंदणीची मुदत १५ जानेवारी २०२४ पर्यंत वाढविण्यात आली आहे. शेतकऱ्यांची होणारी गैरसोय लक्षात घेता राज्याचे वन, सांस्कृतिक कार्य व मत्स्य व्यवसाय मंत्री तथा चंद्रपूरचे पालकमंत्री सुधीर मुनगंटीवार यांनी यासाठी पाठपुरावा केला होता, त्या पाठपुराव्याला काही तासातच यश आले असून शासन निर्णय निर्गमित झाला आहे.



आधारभूत किंमत योजनेअंतर्गत नेमण्यात आलेल्या खरेदी केंद्रावर नोंदणी करून शेतकरी धान व भरडधान्य विक्री करतात. जिल्ह्यात केंद्रांची संख्या फार मोजकी आहे. त्यामुळे ज्या जिल्ह्यात धान व भरडधान्य मोठ्या प्रमाणात उत्पन्न होते त्या जिल्ह्याला या खरेदी नोंदणीच्या मिळालेल्या मुदतवाढीमुळे लाभ होणार आहे. चंद्रपूर जिल्ह्यातील पोंभूर्णा तालुक्यातील शेतक-यांनी याबाबत मागणी केली होती. या मागणीचे गांभीर्य लक्ष्यात घेत वन व सांस्कृतिक कार्य मंत्री सुधीर मुनगंटीवार यांनी धान नोंदणीची मुदत ताबडतोब वाढविण्यात यावी, असा आग्रह केला.यासंदर्भात ना .मुनगंटीवार यांनी राज्याचे अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण मंत्री छगन भुजबळ यांना पत्र लिहत आग्रही मागणी केली. या पत्राची दखल घेत ना.भुजबळ यांनी संबंधित विभागाला काही तासातच आदेश निर्गमित करण्याचे निर्देश दिले. त्यानुसार धान नोंदणीची मुदत आता १५ जानेवारी २०२४ पर्यंत वाढविण्यात आली आहे. काही तासातच केलेल्या मागणीला न्याय मिळाल्याने शेतकऱ्यांनी पालकमंत्री सुधीर मुनगंटीवार यांचे आभार मानले आहे.

## भाजपा ओबीसी मोर्चा पुलगाव शहर कार्यकारिणी जाहीर

**पुलगाव । प्रतिनिधी**

भारतरत्न माजी पंतप्रधान श्रद्धेय अटलबिहारी वाजपेयी यांच्या जयंतीनिमित्त सुशासन दिनाचे औचित्य साधुन मातृसेवा सभागृह पुलगाव येथे सोमवार २५ डिसेंबर ला भाजपा ओबीसी मोर्चा पुलगाव शहर अध्यक्ष अनिल लेकुरवाळे यांनी कार्यकारणी जाहीर करून मान्यवरांच्या हस्ते नियुक्ती पत्र वितरित केले.



भाजपा महाराष्ट्र प्रदेश ओबीसी मोर्चा अध्यक्ष संजय गाते यांच्या अध्यक्षतेखाली पार पडलेल्या या कार्यक्रमात प्रमुख उपस्थिती म्हणून भाजपा जिल्हा अध्यक्ष सुनिल गफाट ,विधान सभा प्रमुख राजेश बकाने ,भाजपा ओबीसी मोर्चा जिल्हा अध्यक्ष मंगेश झाडे महाराष्ट्र प्रदेश अल्पसंख्याक सचिव शकील खान,विधानसभा प्रमुख दिपक फुलकरी,राजीव बतरा व भाजपा शहर अध्यक्ष नितीन बडगे हे उपस्थित होते.भाजपा ओबीसी मोर्चा शहर सरचिटणीस म्हणून जितेंद्र वर्मा , सचिन चौधरी, प्रशांत लोणकर,निरज ब्राम्हणे,उपाध्यक्ष म्हणून नरेन्द्र मानकर, श्रवण मंडले, श्रीकांत बिरे , कन्हैयालाल शाहू , रुपेश कडूकार, पवन पुरेकर , महेश गुप्ता , योगेश टाकळकर , राजेश टारपे,रामकृष्ण दरगुडे, वैशाली घोटेकर वैशाली वरवाडे , नीता ढगे तर सचिव म्हणून प्रीती तरोने , प्रफुल मंथनवार, राजेंद्र थोरात,राजू टारपे, योगेश वडुळकर, रवी पात्रे, अर्चना वरवाडे, कोषाध्यक्ष आतिष वर्मा, शहर संपर्कप्रमुख सुरज सुरस्कार ,युवा संयोजक सुमित शहाडे , महिला संयोजिका प्रगती महाजन, सहसंयोजिका , सोनाली काळे,सोशल मिडीया प्रमुख अमोल वाटकर,सह प्रमुख अजिंक्य गाते, मन की बात प्रमुख वामनराव डेहनकर, विश्व कर्मा योजना प्रमुख संतोष गंगुलवार, सरल प प्रमुख पंकज तुरणकर, सदस्य म्हणून कैलास मारबते,सागर गुप्ता, प्रविण कपाट,मोहन अडेकर,जयश्री बांगरे,सागर पसारे,शालू पांडे,यांच्या नियुक्त्या करून नियुक्ती पत्र देण्यात आले.

## भद्रावती येथे व्हाईस ऑफ मिडीयाची बैठक संपन्न

**भद्रावती । प्रतिनिधी**

आज दिनांक २९ डिसें २०२३ रोजी व्हॉईस ऑफ मिडीया भद्रावती शाखेची बैठक घेण्यात आली. बैठकीच्या अध्यक्षस्थानी ज्येष्ठ पत्रकार अशोक पोतदार होते. यावेळी पुढील महिन्यात होर्णाय़ा पत्रकार दिनाच्या कार्यक्रमासंबंधी चर्चा करण्यात आली. दि. ११ जानेवारीला पत्रकार दिन कार्यक्रम सर्वसंमतीने साजरा करण्याचे ठरले. दि. ११ जानेवारीला सकाळी ९ वाजता फळवाटप करण्याचे ठरले. तसेच फळवाटपानंतर लगेच मुकबधीर विद्यार्थांना नोटबुक व पेन वितरणाचा कार्यक्रम करण्याचे ठरले आहे.तसेच त्याचदिवशी सायंकाळी सहपरिवार स्नेहभोजनाचा कार्यक्रम घेण्याचे ठरले आहे. या बैठकीला डॉ.



यशवंत घुमे, अशोक पोतदार, सुनील बिपटे, सुधीर पारधी, सुनील पतरंगे, जावेद शेख, वतन लोणे आदी मान्यवर उपस्थित होते.

## माजी विद्यार्थ्यांच्या वतीने स्पर्धा परीक्षा आणि शिष्यवृत्ती योजना यावर मार्गदर्शन

**गडचांदुर । प्रतिनिधी**

येथील शरदराव पवार कला व वाणिज्य महाविद्यालयाच्या माजी विद्यार्थी समितीच्या वतीने विद्यमान विद्यार्थ्यांकरिता स्पर्धा परीक्षा आणि शिष्यवृत्ती योजनेवर सखोल मार्गदर्शन करण्यात आले.

यावेळी महाविद्यालयाचे माजी विद्यार्थी आणि प्रेरणा प्रशासकीय महाविद्यालय गडचांदुर येथील प्रभारी प्राचार्य प्रा.नानेश्वर धोटे यांनी स्पर्धा परीक्षा याबाबत विद्यार्थ्यांना सखोल मार्गदर्शन केले. परीक्षेत येणाऱ्या विविध अभ्यासक्रमावर चर्चा केली. प्रामाणिक आणि कठोर मेहनतीमुळे स्पर्धा परीक्षा नक्कीच पास होऊ शकते असा आशावाद त्यांनी यावेळी व्यक्त केला.स्पर्धा परीक्षा बाबतच्या विविध पदांविषयी मुलाखती विषयी त्याचबरोबर अभ्यासक्रमाच्या आणि अभ्यासाच्या पद्धती यावर त्यांनी आजी विद्यार्थ्यांना सखोल मार्गदर्शन केले.यावेळी महाविद्यालयाचे माजी विद्यार्थी सुरेश गावंडे यांनी शासनाकडून मिळत असलेल्या विविध शिष्यवृत्ती योजना बाबत विद्यार्थ्यांना अवगत केले त्यांनी विद्यार्थ्यांना



विविध जातीनिहाय शिष्यवृत्ती,एचपीसीएल शिष्यवृत्ती, तसेच शाहू महाराज शिष्यवृत्ती इत्यादी बाबत विद्यार्थ्यांना अभ्यासपूर्ण माहिती दिली यावेळी पदवीच्या तिन्ही वर्गाचे विद्यार्थी उपस्थित होते यावेळी विद्यार्थ्यांनी त्यांच्या स्पर्धा परीक्षा आणि शिष्यवृत्ती योजनेच्या बाबतच्या अडचणी विचारून सर्व अडचणीचे निरसन केले आहे.यावेळी महाविद्यालयाच्या वतीने माजी विद्यार्थी प्रा. नानेश्र्वर धोटे आणि सुरेश गावंडे यांचे माजी विद्यार्थी समितीचे समन्वयक डॉ.संजय गोरे यांनी आभार मानले.

## ५१ हजार महामृत्युंजय मंत्र लिहित वरोर्याच्या गायत्रीने रेखाटले उद्योगपती रतन टाटा यांचे चित्र

**वरोरा । प्रतिनिधी**

उद्योगपती रतन टाटा यांच्या वाढदिवसानिमित्य वरोर्यातील गायत्री खोके या मुलींनी ५१ हजार महामृत्युंजय मंत्र लिहित सात फुट उंचीचे चित्र रेखाटत रतन टाटा यांना त्यांच्या वाढदिवसाच्या अनोख्या शुभेच्छा दिल्या. गायत्री खोके हिने या आधी महाराष्ट्रातील विविध संतांचे चित्र रेखाटले आहे. तर उद्योगपती रतन टाटा यांच्या वाढदिवसानिमित्य ७ फुट उंचीचे चित्र रेखाटत त्यात ५१ हजार महामृत्युंजय मंत्र आणी जय हिंद जय भारत असे लिहिले आहे. या मंत्रामध्ये एकूण ३३ शब्द आहे म्हणजेच १६ लाख ८३ हजार शब्द लिहिले आहे. ही पेंटिंग त्यांच्या वाढदिवसानिमित्य तयार केली आहे. ते रेखाटलेले चित्र गायत्री ही रतन टाटा यांची भेट घेऊन त्याना देऊ असे प्रसार माध्यमाशी बोलताना तीने सांगितले आहे. ती पेंटिंग सर्वांचे लक्ष आकर्षित करणारी आहे. वरोरा तालुक्यात या काढलेल्या पेंटिंग ची चर्चा होत आहे.



सह्याद्रीचा राखणदार



## राष्ट्रीय क्रीडा स्पर्धेत रंगतेय चुरस

# १०० मीटर धावण्याच्या शर्यतीत महाराष्ट्राचा जेसन कॅस्टेलीनो ११.०३ सेकंदाची वेळ नोंदवत अव्वल







**चंद्रपूर । प्रतिनिधी**

बल्लारपूर तालुका क्रीडा संकुल येथे सुरू असलेल्या ६७ व्या राष्ट्रीय शालेय मैदानी क्रीडा स्पर्धेच्या विविध सामन्यात विजयी होण्यासाठी प्रत्येक खेळाडू उत्कृष्ट प्रदर्शन करीत असल्याने स्पर्धेत आता चांगलीच चुरस वाढली आहे.आज मुली व मुलांच्या १९ वर्षाखालील गटातील थाळी फेक, गोळा फेक, तिहेरी उडी, बांबू उडी, १५०० मीटर, ४०० मीटर व १०० मीटर धावण्याची स्पर्धा, ४द१०० रिले, ५००० मीटर चालने (मुले), ३००० मीटर चालने (मुली) या स्पर्धेच्याअंतिम सामन्यात खेळाडूंनी आपले कौशल्य पणाला लावत विजय मिळविला. तर प्रथम फेरीसाठी ८०० मीटर, २०० मीटर व ४०० मीटर अडथळ्याची शर्यत, गट-अ व गट-ब च्या पात्रता फेरीसाठी भाला फेक, थाळी फेक, लांब उडी च्या सामन्यातही स्पर्धेत चांगलीच रंगत आली.आज झालेल्या विविध अंतिम सामन्यात १९ वर्षाखालील मुलांच्या गटातील १०० मीटर धावण्याच्या शर्यतीत महाराष्ट्राच्या जेसन जेम्स कॅस्टेलीनो याने ११.०३ सेकंदाची वेळ नोंदवत अव्वल स्थान पटकावले. आंध्रप्रदेशच्या वल्लीगी हिमतेजा याने ११.१५ सेकंदात द्वितीय तर महाराष्ट्राच्याच दुर्वेश पवार याने ११.२३ सेकंदाची

वेळ नोंदवत तिसरा क्रमांक पटकावला. मुलींच्या गटातील १०० मीटर धावण्याच्या शर्यतीत कौन्सिल फॉर द इंडियन स्कूलच्या सिया सावंत ने ११.६५ सेकंदाची वेळ नोंदवत अव्वल स्थान पटकावले. महाराष्ट्राच्या अलिझा मौला आणि तामिळनाडूच्या अभिनया आर. यांनी द्वितीय व तिसरा क्रमांक पटकावला. यात अलिझाने १२.१७ सेकंद, तर अभिनयाने १२.३१ सेकंदाची वेळ नोंदवली.मुलांच्या गटातील ५००० मीटर चालण्याची शर्यत हरयानाच्या सचिनने २०.२६.१५ मिनिटांमध्ये पूर्ण करत अव्वल स्थान पटकावले. उत्तर प्रदेशच्या नितीन गुप्ता आणि राजस्थानच्या सचिन गहरवाल यांनी द्वितीय व तिसरा क्रमांक पटकावला. यात नितीनने २०.२७.८६ मिनिटे, तर सचिन ने २०.३९.११ मिनिटांची वेळ नोंदवली. मुलींच्या गटातील ३००० मीटर चालण्याच्या शर्यतीत राजस्थानच्या खुशबू यादव ने १३.५२.२९ मिनिटांमध्ये अंतर पूर्ण करत अव्वल स्थान पटकावले. तर हरयानाच्या पायल आणि राजस्थानच्या कवीता दुडी यांनी दुसरा व तिसरा क्रमांक पटकावला. यात पायलने १४.२५.५१ मिनिटे, तर कवीताने १४.३६.१८ मिनिटांची वेळ नोंदवली.मुलांच्या १५०० मीटर धावण्याच्या स्पर्धेत उत्तर प्रदेशच्या शहारूख खानने प्रथम स्थान पटकावले. उत्तराखंडच्या प्रियांशूनने द्वितीय आणि हरयानाच्या बलजीत सिंगने तृतीय क्रमांक पटकावला. तसेच मुलींच्या १५०० मीटर धावण्याच्या स्पर्धेत छत्तीसगडच्या सानिका राजुर्देने प्रथम स्थान, उत्तर प्रेशच्या अंशू हिने द्वितीय आणि तामिळनाडूच्या अन्सलीन हिने तिसरा क्रमांक पटकावलामुलांच्या ४०० मीटर धावण्याच्या स्पर्धेत केरळच्या अभिराम पी. याने प्रथम स्थान पटकावले. पश्चिम बंगालच्या स्वपन अहिर याने दुसरा आणि कर्नाटकच्या एन. ध्रुव बल्लाल यांने तिसरा क्रमांक पटकावला. तसेच मुलींच्या ४०० मीटर धावण्याच्या स्पर्धेत स्पर्धेत केरळच्याच ज्योतिका एम. हिने प्रथम स्थान पटकावले. तर कर्नाटकच्या रिथाश्री आणि केरळच्या सारिका सुनिलकुमार यांनी द्वितीय व तिसरा क्रमांक मिळवला. १९ वर्षाखालील मुलांच्या लांब उडी स्पर्धेत मोहम्मद मुहासने ७.२८ मीटर लांब उडी मारत अव्वल स्थान पटकावले. तर हरियानाच्या मोहम्मद अता साजीदने ७.२२ मीटर उडी मारून द्वितीय आणि उत्तर प्रदेशच्या मोहम्मद तैसिफने ७.०९ मीटर लांब अंतर नोंदवत तिसरे स्थान पटकावले.उत्तरप्रदेशच्या अनुष्का यादव हिने हॅमर थ्रो मध्ये ६५.३८ मीटर अंतर नोंदवले.

## राष्ट्रीय खेळ प्रत्यक्षात बघण्यासाठी ग्रामीण भागातील ३ हजार विद्यार्थ्यांची क्रीडा स्पर्धेला भेट

**चंद्रपूर । प्रतिनिधी**

तालुका क्रीडा संकुल, विसापूर, येथे सुरू असलेल्या ६७ व्या शालेय मैदानी क्रीडा स्पर्धा प्रत्यक्षात बघण्यासाठी जिल्हा परिषदेच्या ग्रामीण भागातील ३ हजार विद्यार्थ्यांनी बल्लारपूर क्रीडा संकूल येथे भेट दिली व खेळाडूंचा थरार अनुभवला.



ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना राष्ट्रीय क्रीडा स्पर्धा प्रत्यक्षात बघता यावी व त्यापासून प्रेरणा घेऊन विद्यार्थ्यांची खेळामध्ये आवड निर्माण व्हावी, यासाठी जिल्ह्याचे पालकमंत्री सुधीर मुनगंटीवार यांनी मुख्य कार्यकारी अधिकारी विवेक जॉन्सन यांना सुचना केल्या होत्या. त्यानुसार जिल्हयातील इयत्ता ७ ते १२ च्या विद्यार्थ्यांना क्रीडा स्पर्धेस भेट देण्याचे नियोजन शिक्षणाधिकारी राजकुमार हिवारे यांनी केले. प्रत्येक तालुक्यातील गटशिक्षणाधिकारी यांना निर्देश देऊन तालुकानिहाय १०० विद्यार्थ्यांचे नियोजन करण्यात आले.प्रति दिवस प्रत्येक तालुका १०० विद्यार्थी याप्रमाणे दिवसाला १५०० विद्यार्थी असे दोन दिवसात एकूण ३००० विदयार्थ्यांनी या स्पर्धेस भेट दिली आहे. तसेच दिनांक ३० डिसेंबर २०२३ ला १५०० विदयार्थ्यांची भेट नियोजित आहे. राष्ट्रीय क्रीडा स्पर्धाकरीता विद्यार्थ्यांमध्ये व पालकामध्ये प्रचंड उत्साह आहे. मुख्य कार्यकारी अधिकारी यांच्या सुचनेनुसार विद्यार्थ्यांसाठी भोजनाची व्यवस्था करण्यात आलेली आहे.तालुका स्तरावरुन प्रत्यक्ष क्रीडा संकुलापर्यंत विद्यार्थी आणण्यासाठी परिवहन विभागातर्फे बसेची व्यवस्था करण्यात आली होती. यासाठी प्रादेशिक परिवहन अधिकारी किरण मोरे, मोटार वाहन निरीक्षक विलास ढेंगणे, सहा. मोटार वाहन निरीक्षक नरेंद्र उमाळे, चेतन गरुकर यांच्यासह विद्यार्थ्यांची ही भेट यशस्वी व्हावी, यासाठी शिक्षणाधिकारी राजकुमार हिवारे, सर्व तालुक्यांतील गटशिक्षणाधिकारी यांनी सहकार्य केले.

## महिला कॉँग्रेस कार्यकर्त्यांच्या उपस्थित कॉँग्रेस नेते दिनेश चोखारे यांच्या दिनदर्शिकाचे वाटप



**बल्लारपूर । प्रतिनिधी**

कृषी उत्पन्न बाजार समितीचे माजी सभापती, कॉँग्रेसचे नेते दिनेश चोखारे यांनी प्रकाशित केलेल्या दिनदर्शिका २०२४ चे बल्लारपूर येथील राजेन्द्र प्रसाद वॉर्ड, मौलाना वॉर्डात महिला कॉँग्रेस कार्यकर्त्याच्या उपस्थित दिनदर्शिकाचे वाटप करण्यात आले.

कॉँग्रेसचे नेते दिनेश चोखारे यांनी नागपूर येथे महाराष्ट्र कॉँग्रेस चे प्रदेशाध्यक्ष नाना पटोले यांच्या हस्ते प्रकाशित केले होते. त्यानंतर दिनदर्शिकाचे वाटप सुरु असून बल्लारपूर येथील मौलाना वॉर्ड, राजेंद्र प्रसाद वॉर्डात बल्लारपूर कॉँग्रेस महिला विभागाच्या तालुका अध्यक्ष अफसान सय्यद याचे उपस्थित महिला कॉँग्रेस कार्यकर्त्यांनी कॅलेंडर वाटप केले. ही दिनदर्शिका २०२४ ची आहे. यात प्रत्येक महिन्याची माहिती तसेच महत्त्वाच्या घटनांची नोंद आहे. दिनदर्शिका ही एक शैक्षणिक आणि माहितीपूर्ण साधन आहे. या दिनदर्शिकेमुळे लोकांना वेळेचे नियोजन करण्यात मदत होईल.

## जानाळा येथे वाघाच्या हल्ल्यात शेतकरी ठार

**मूल । प्रतिनिधी**

तालुक्यातील जानाळा गावातील शेती कामासाठी शेतावर गेलेल्या शेतकर्यावर वाघाने हल्ला करून ठार केल्याची घटना आज उघडकीस आली. सुभाष कडपे मु.जानाळा (४०) असे मृतक शेतकऱ्याचे नाव आहे.ही घटना कक्ष क्रमांक ५२३ मध्ये घडली.या घटनेची माहिती मिळताच पोलिसांनी पोहचले .सुभाष कडपे काल आपल्या शेतात शेती कामा करिता गेला होता मात्र तो परत आला नाही. त्याचा शोध घेतला असता आज सकाळी



छिन्नविछिन्न अवस्थेत त्याचा मृतदेह आढळून आला. वाघाने त्याचा बळी घेतल्याचे स्पष्ट झाले.मृतक सुभाष चे मागे त्याची पत्नी व मुलगी असा परिवार आहे.

## विनोद काकडे यांचे निधन

**चंद्रपूर :** चिमूर येथील महाराष्ट्र राज्य वीज वितरण कंपनीत सहायक लेखापाल पदावर कार्यरत



विनोद बाजीराव काकडे यांचे शुक्रवारी (ता. २९) पहाटे ५ वाजताच्या सुमारास हृदयविकाराच्या धक्क्याने निधन झाले. ते ५५ वर्षांचे होते. ब्रह्मपुरी येथील निवासस्थानाहून आज दुपारी त्यांची अंत्ययात्रा निघाली. कुटुंबीय, नातेवाईक आणि गणमान्य नागरिकांच्या उपस्थितीत ब्रह्मपुरी येथील स्मशानभूमीत त्यांच्यावर अंत्यसंस्कार करण्यात आले. त्यांच्या पश्चात बराचमोठा आप्तपरिवार आहे. पत्रकार प्रमोद काकडे यांचे ते थोरले बंधू होते.

## ‘राष्ट्रीय ग्राहक दिन’ मार्गदर्शनपर कार्यक्रमाने साजरा

**चंद्रपूर :** ‘राष्ट्रीय ग्राहक दिन’ निमित्त ग्राहकांचे हक्क, ग्राहक कायद्याचा वापर व ई-कॉमर्स व्यवहारातील दक्षता याबाबत जिल्हा प्रशासनाद्वारे विशेष मार्गदर्शनपर कार्यक्रमाचे नुकतेच तहसिल कार्यालय येथे आयोजन करून राष्ट्रीय ग्राहक दिन साजरा करण्यात आला.कार्यक्रमाला, ग्राहक पंचायतचे जिल्हाध्यक्ष परशुराम तुंडुलवार, अखिल भारतीय ग्राहक पंचायतचे जिल्हाध्यक्ष नंदिनी चुनारकार, सहायक जिल्हा पुरवठा अधिकारी पांडुरंग माचेवाड, खरेदी अधिकारी हेमंत गांगुर्डे, सहायक लेखा अधिकारी प्रमोद बोरसरे, आशिष मिश्रा, आनंद मेहेरकुरे आदींची उपस्थिती होती.याप्रसंगी परशुराम तुंडुलवार यांनी ग्राहक चळवळीचा इतिहास व ग्राहक हक्कांच्या संवर्धनासाठी असलेली व्यवस्था याबाबत तर नंदिनी चुनारकार यांनी ई-कॉमर्स आणि डिजिटल व्यापाराच्या युगात ग्राहक संरक्षण या विषयावर मार्गदर्शन केले. ग्राहकांचे अधिकार व ग्राहकांनी बाळगावयाच्या दक्षतेबाबत पांडुरंग माचेवाड यांनी तर हेमंत गांगुर्डे यांनी ग्राहक कायदे व त्यांचा ग्राहक संरक्षणासाठी वापर याबाबत मार्गदर्शन केले.कार्यक्रमाचे प्रास्ताविक नायब तहसिलदार राजू धांडे यांनी केले. संचालन पुरवठा निरीक्षक खुशबु चौधरी, यांनी तर सुषमा उरकुडे यांनी उपस्थितांचे आभार मानले. कार्यक्रमाला विजय पवार, मंजुषा काकडे, ग्राहक संघटनांचे पदाधिकारी सदस्य, तहसिल कार्यालय व अन्न व नागरी पुरवठा विभागातील अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.

# मूल तालुक्यात ४ हजार घरकुल मात्र रेती घाटामुळे घरकुलांचे काम रखडले

## तात्काळ रेती घाट लिलाव करण्याची मंगेश पोटवार यांची मागणी

**मूल । प्रतिनिधी**

गरीब आणि गरजु नागरीकांना त्यांच्या निवाऱ्यांचा प्रश्न सुटावा यासाठी शासनाने घरकुल योजना मंजुर केली असुन मूल तालुक्यात ४ हजार १७ घरकुल मंजुर आहेत ,मात्र घरकुल बांधकाम करण्यासाठी वाळू उपलब्ध नसल्याने जवळपास ५ हजार रूपये ब्रास प्रमाणे वाळू खरेदी करावे लागत असुन अनेक लाभार्थ्यांनी अजुनही घरकुलाचे बांधकामाला सुरूवात केलेली नाही. यामुळे शासनाने तात्काळ वाळू घाटाचे लिलाव करावे अशी मागणी राष्ट्रवादी कॉँग्रेसचे मूल तालुकाध्यक्ष मंगेश पोटवार यांनी जिल्हाधिकारी यांचेकडे केली आहे.

शासनाने ग्रामीण भागातील कुटुंबाचा विकास करण्याच्या दृष्टीने विमुक्त जाती,भटक्या जमाती प्रवर्गातील लाभार्थ्यांसाठी असलेल्या यशवंतराव चव्हाण मुक्त वसाहत घरकुल योजनेतून मूल पंचायत समिती अंतर्गत या वर्षासाठी १९५४ लाभार्थ्यांच्या घरकुल प्रस्तावास शासनाने मान्यता दिली आहे. पंतप्रधान आवास योजनेच्या माध्यमातुन तालुक्यातील ११७४ घरकुल लाभार्थ्यांचे प्रस्तावाला मान्यता मिळाली आहे.अनुसुचित जाती,नवबौध्द कुटुंबाचे राहणीमान उंचावने व त्यांचा निवाऱ्याचा प्रश्न सुटावा यासाठी शासनाने रमाई आवास घरकुल योजने अंतर्गत ३२० घरकुल लाभार्थ्यांच्या प्रस्तावाला मान्यता प्राप्त झाली आहे. अनुसूचित जमातीच्या व्यक्तींसाठी शबरी आवास योजनेच्या माध्यमातुन २५० घरकुलांना मान्यता प्राप्त झाली आहे. तर नगर पालिका क्षेत्रात रमाई आवास योजनेचे १३७ तर पंतप्रधान आवास योजनेचे १८३ प्रस्तावाला मान्यता प्राप्त झाली आहे.सदर घरकुलांना मान्यता प्राप्त झाल्यामुळे घरकुल लाभार्थ्यांचे स्वप्न साकार होणार आहे.तालुक्यात वाळू घाटांचा लिलाव झालेला नसल्याने घरकुल लाभार्थ्यांना जवळपास ५ हजार रूपये ब्रास प्रमाणे वाळु खरेदी करावे लागत आहे.यामुळे अनेक लाभार्थ्यांनी घरकुलाचे काम थांबवुन दिलेले आहे. निवाऱ्याचा प्रश्न कायम सुटावा यासाठी शासनाने घरकुल मंजुर केलेले आहेत परंतु जादा दराने वाळू खरेदी करावी लागत असल्याने अनेकांचे घरकुलाचे स्वप्न यावर्षीही पुर्ण होणार की नाही या चिंतेत घरकुल लाभार्थी आहेत.जिल्हयाचे पालकमंत्री नामदार सुधीर मुनगंटीवार यांच्या प्रयत्नातुन मूल तालुक्यात मोठया प्रमाणावर विकासकामे सुरू आहेत. त्यासाठीही वाळूची आवश्यकता आहे,शासनाने मूल तालुक्यातील घरकुल लाभार्थी, विकासकामे व जनतेचा विचार करून मूल तालुक्यातील वाळूघाटांचा तात्काळ लिलाव करावा अशी मागणी राष्ट्रवादी कॉँग्रेसचे जिल्हाध्यक्ष नितीन भटारकर यांच्या मार्गदर्शनाखाली मूल तालुकाध्यक्ष मंगेश पोटवार यांनी राज्याचे मुख्यमंत्री ना. एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री ना. अजित पवार, जिल्हयाचे पालकमंत्री ना.सुधिर मुनगंटीवार,जिल्हाधिकारी,जिल्हा खनिकर्म अधिकारी यांचेकडे केली आहे. यावेळी शहराध्यक्ष आकाश येसनकर, राष्ट्रवादी महिला कॉँग्रेसच्या संगीता गेडाम, राष्ट्रवादी युवक कॉँग्रेसचे रोहित कामडे , निहाल गेडाम उपस्थित होते.यावेळी जिल्हाधिकारी विनय गौडा यांनी लवकरच डेपो सुरु करून घरकुल लाभार्थ्यांना व घर बांधकाम करणाऱ्या नागरीकांना सरकारी दरानुसार वाळू उपलब्ध करून देण्याचे आश्वासन शिष्टमंडळाला दिले.

सह्याद्री चा राखणदार दैनिक वृत्तपत्र मालक ,प्रकाशक मारोती नारायण घुमे यांचे करिता संपादक आशिष मारोती घुमे यांनी मुद्रक सुरज भक्तराज घुमे सहयाद्री मल्टी सर्व्हिसेस, कर्मवीर वॉर्ड वरोरा(४४२९०७ ) येथून मुद्रीत करून मातृछाया भवन कर्मवीर वॉर्ड, वरोरा (४४२९०७)येथून प्रकाशित केले आहे . यातील प्रकाशित मजकुराशी संपादक सहमत असेलच असे नाही .यातील मजकुरांवर आक्षेप झाल्यास त्याचे निवारण वरोरा न्यायालया अंतर्गत होईल.
Sahyadri Cha Rakhandar Daily Newspaper Owner Publisher Maroti Narayan Ghume Editor Ashish Maroti Ghume Printer Suraj Bhaktaraj Ghume Sahyadri Multi Services, Karmaveer Ward Warora.(442907) The editor does not necessarily agree with the content published herein. Objections to the content shall be redressed under the warora Courts. .